REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# मराठाकालीन निवासी वास्तू : किन्हई येथील पंतप्रतिनिधी यांचा वाडा

श्री. राजेंद्र कृष्णा देशमुख
संशोधक विद्यार्थी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## प्रस्तावना:



छ. शाहूंनी सातारा ही राजधानी केल्यानंतर सातारा येथे अदालत वाडा बांधला. पेशव्यांचा उदय झाल्यानंतर सातारा प्रदेशामध्ये अनेक नवीन घराणी उदयास आली. पुणे येथे पहिले बाजीराव पेशव्यांनी शनिवारवाडा बांधल्यानंतर दुसरे पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या काळात व नंतर अनेक सरदार मराठा सरदार मराठी साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी पुढे आले. उत्तरेमध्ये सैनिक, राजनैतिक अधिकारी व प्रशासक यांची संख्या सतत वाढत राहिली. पेशव्यांनी त्यांच्याशी निष्ठा असणारे सरदार निर्माण केले व त्यांना मदत केली. या सरदारांनी आपल्या प्रदेशातून मोठया प्रमाणावर संपत्ती गोळा केली. या सरदारांनी आपल्या मूळ गावामध्ये आणि सातारा व पुणे येथे मोठे वाडे उभारले. उपनगरामध्ये राहण्यासाठी आपल्या समर्थकांना जागा दिल्या व महसूलामध्ये सवलती दिल्या. त्यांनी अनेक भव्य वाडे उभारले, विविध वस्तूंनी वाडे सजविले.[1] यातील काही वाडे अद्यापही सुस्थितीमध्ये आहेत.

## पंतप्रतिनिधींचा वाडा:

सातारा रोडपासून 10 कि.मी. अंतरावर किन्हई हे गाव आहे. वांग नदीमुळे हे गाव दोन भागामध्ये विभागले आहे. पूर्वे कडील भाग पेठ किन्हई व पश्चिमेकडील भाग पंतांची किन्हई म्हणून ओळखला जातो. औंधचे प्रतिनिधी घराणे छ.राजाराम यांच्या कारकिर्दीमध्ये उदयास आले. कोरेगाव तालुक्यातील हिवरे हे त्यांचे मूळगाव होते.[2] त्यांचा नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर वाडा आहे.

## दर्शनी बाजू:

हा वाडा तीन मजली असून **3.6** फूट उंचीच्या व **60** फूट लांबीच्या दर्शनी दगडी जोत्यावर उभारलेला आहे. जोत्यावर जाण्यासाठी **1.3** फूट रूंदीच्या पायऱ्या आहेत. जोत्यावरील प्रत्येक खांबाच्या खालील बाजूस लोखंडी कडे आहे. मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूस **19** फूट लांब व **5** फूट लांबीचा व्हरांडा आहे. वाडयाच्या बाजूच्या भिंती **4** फूट रूंदीच्या आहेत. व्हारांडयास एकूण **24**खांब आहेत. खांबांची रचना साधी आहे. दर्शनी बाजूच्या खांबांखाली एक फूट चौरस आकाराचा जाडयाकुंभाचे मोलीमे असलेले तळखडे आहेत. वरील बाजूस तुळईस हस्त आहेत. हस्ताच्या दोन्ही बाजूस कमलदलातून वर आलेल्या देठामध्ये मोराच्या मानेपासून चोचीपर्यंतचे काष्ठशिल्प ठेकून बसविलेले आहे . तुळईच्या हस्ताच्या समोरील बाजूस पिसारा फुलविलेल्या मोराचे काष्ठशिल्प असावे सध्या ती जागा रिकामी आहे. परंतु ही शिल्पे काढून नेल्याचे स्पष्ट दिसते. हस्ताच्या वरील बाजूस नक्षीकाम केलेली आडवी पट्टी आहे. दोन्ही बाजूच्या भिंतींमध्ये लहान बहूपर्णी कमान असलेल्या देवडया आहेत. व्हरांडयामध्ये उजव्या बाजूच्या भिंतीमध्ये तीन व समोरील भिंतीमध्ये सहा बहूपर्णी कमानी असलेल्या **2** फूट उंचीच्या व **1.6** फूट रूंदी देवडया आहेत. दोन **1.6** फूट चौरस देवडया आहेत. डाव्या बाजूस **6** फूट उंची व **2.6** रूंद गोलाची कमान असलेली चौकट आहे. येथून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी जिना आहे. मुख्य दरवाजाची चौकट त्रिशाखी असून उंची **10** फूट व रूंदी **4** फूट असून दरवाजास दिंडी दरवाजा आहे. दरवाजा लोखंडी

पट्टया ठोकून मजबूत केलेला आहे. चौकटीच्या पहिल्या शाखेवर ॲथॅक्स शैलीमध्ये फुलांची नक्षी कोरलेली आहे. दरवाजाच्या मागील बाजूस आडण्याची सोय केलेलीआहे.[3]

**तळमजला :**

चौकटीमधून आत प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूस रिकामे सोपे दिसतात. समोर $25' \times 25'$ मापाचा चौक आहे. या चौकच्या जोत्याच्या चारी कोपऱ्यावर चार सपाट तिरके दगड लावलेले आहेत. या चौकातून पावसाचे पाणी बाहेर जाण्यासाठी जोत्यास लागून छोटसे गटार काढून दिले आहे. उजव्या बाजूच्या सोप्यामध्ये दोन खणामध्ये एक खोली बांधलेली आहे. या खोलीस तिन्ही बाजूस दरवाजे व एक खिडकी आहे. खिडकीला लाकडी चौरस आकाराच्या पट्टया बाहेरील बाजूस कोन करून लावलेल्या आहेत. डाव्या बाजूकडील सोप्यामध्येही खोली बांधलेली आहे. समोरील सोप्यामध्ये डावीकडील एका खणामध्ये खोली बांधलेली असून ते देवघर आहे.[4]

देवघर प्रशस्त आहे. देवघराची चौकट चारशाखी असून पहिल्या शाखेवर ॲथॅक्स शैलीमध्ये वेल व फुलांची नक्षी कोरलेली आहे. नंतरच्या दोन शाखा अंतर्गोल मोलीमेच्या आहेत. चौथी शाखा साधी आहे या चौकटीमध्ये टोकाची बहूपर्णी केळफूल असलेली कमान बसविलेली आहे. या चौकटीची उंची **6** फूट असून रूंदी **4** फूट आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस **6** फूट उंच व दोन फूट रूंदीच्या लाकडी जाळया बसविलेल्या आहेत. देव्हाऱ्याचा मंडप **5** फूट उंच व चार फूट रूंदीचा असून त्यास सुरूचे खांब आहेत. खांबांना केळफूल असलेली टोकाची बहुपर्णी कमान आहे. मंडपाचे छत चौकानी लाकडी जाळीचे आहे. हा मंडप लाकडी असून त्यावर सुंदर कोरीव काम केलेले आहे. देव्हाऱ्यामध्ये गणपतीचे चित्र काढलेले आहे. देवघराच्या भिंतीमध्ये व सोप्यामध्ये दोन फूट उंचीच्या व दिड फूट रूंदीच्या बहूपर्णी कमानीच्या देवळया आहेत. या सोप्यामध्ये अनेक रंगीत चित्रे काढलेली आहेत. या सोप्यातून आत जाण्याच्या चौकटीच्या उजव्या बाजूस दत्ताचे व डाव्या बाजूस रामदास स्वामी व खेडूतांचे रंगीत चित्र काढलेले आहे. चौकटीच्या वरील बाजूस शेषनारायणचे रांगीत चित्र काढलेले आहे. या चौकटीच्या शेजारीच दुसऱ्या खोलीची चौकट आहे. ही चौकट चार शाखी असून तिच्या ललटबिंबावर टोकाच्या बहुपर्णी कमानीमध्ये गणेश असून बाजूस वेलीची नक्षी कोरलेली आहे. चित्रे काढलेल्या चौकटीमधून आत स्वयंपाकघर आहे. येथे पाणी सााठविण्यासाठी भिंतीमध्ये दगडी हौद केलेले आहेत. भिंतीमध्ये धान्य साठविण्यासाठी दोन पेव तयार केलेले आहेत. स्वयंपाकघरामध्ये धूर राहू नये म्हणून पुरेसे झरोखे ठेवलेले आहेत. स्वयंपाकघरामागे दुसरा चौक आहे. या चौकामध्ये कॅप्सूलच्या आकाराचा दगडी बांधकाम केलेला **12** टप्पे असलेला सुमारे **70** फूट खोल असलेला आड आहे. आडामध्ये उतरण्यासाठी प्रत्येक टप्प्यामध्ये चौकोनी आकाराच्या खोबण्या आहेत. या चौकातच पश्चिम बाजूस दोन शौचालय व दोन प्रसाधनगृहे आहेत. येथील इमारतीचा भाग ढासळला आहे.[5]

**पहिला मजला :**

स्वयंपाकघरातून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी भिंतीमध्ये **2** फूट रूंदीचा जिना आहे. या मजल्यावर कागदपत्रे ठेवण्याच्या खोली आहे. अद्यापही अनेक कागदपत्रे कुजलेल्या अवस्थेत आहेत. एका भिंतीमध्ये दोन फूट रूंद व **13** फूट लांबीची गुप्त खोली आहे. या खोलीत जाण्यासाठी दोन फूट उंची व **2** फूट रूंदीची जमीनीस लागून खिडकी आहे. हा मजला दोन घाई असून संपूर्ण मोकळा आहे या मजल्यावर भिंतीमध्ये गोल कमानीच्या देवळया आहेत. पश्चिमेस **4**फूट उंच व **2** फूट रूंदीची एक खिडकी आहे.[6]

**दुसरा मजला :**

येथून दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी भिंतीतून **2** फूट रूंदीचा जिना आहे. दुसरा मजला छोटा असला तरी तो तीन घाई आहे परंतु मधला भागच उपयोगी पडण्यासारखा आहे. या मजल्यावर पूर्वेकडील भिंतीमध्ये छोटीसी खिडकी आहे. भिंतीमध्ये गोल कमानीच्या देवळया आहेत. याच्या तुळई साध्या असल्यातरी अद्याप मजबूत आहेत. वळचणीचा भाग फारसा उपयुक्त नाही.

येथून पहिल्या मजल्यावर परत येऊन पहिल्या मजल्याच्या बाहेरील भागामध्ये यावे लागते हा दर्शनी भाग आहे. या भागामध्ये चारी बाजूस प्रत्येक खणामध्ये पाच **4** फूट उंच व **2** फूट रूंदीची खिडकी आहेत. खिडक्यांना दारे आहेत. भिंती बांधताना लाकडी पट्टया एकमेकांमध्ये तिरक्या बसवून जाळी तयार केली आहे. त्यामध्ये मातीच्या विटा बसून मजबूती आणली आहे त्यावर मातीचा व चुन्याचा गिलावा केलेला आहे. प्रत्येक खणामध्ये चौकटीच्या वरील बाजूस गोल, चौकोनी, षटकोनी आकाराचे भोके आहेत. यातून पुढील बाजूस येताना **12** फूट लांब व सात फूट रूंदीच्या खोल्या आहेत. पश्चिमेकडील खोलीच्या भिंतीमध्ये एक शौचालय आहे. या खोलीनंतर **40** फूट लांब व **20** फूट रूंदीचा प्रशस्त हॉल आहे. या हॉलमधील खांब साधे आहेत परंतु केळफूल

असलेल्या मध्ये व दोन्ही बाजूस महिरूपी कमानी आहेत. कमानीच्या वरील बाजूस चौफेर द्राक्षवेलीची नक्षी कोरलेली आहे. या हॉलला लागून बाहेरील बाजूस सज्जा असून त्यासही केळफूल असलेल्या कमानी आहेत. आतील चौकाच्या बाजूस पागोळयाला शरभमुखी सुंदर तीर आहेत. येथून जिन्याने तळमजल्यावर येण्यासाठी जिना आहे. हा जिना वाडयाच्या बाहेरील जोत्यावर संपतो. वाडयाचे दुसऱ्या मजल्याचे छत सोडल्यास संपूर्ण छत कडीपाटाचे आहे. छप्परावर भाजलेल्या मातीची अर्धगोल कौले आहेत.[7]

## वाडयाची बाह्यबाजू:

वाडयाचे बांधकाम दगड, विट, माती व चुन्यामध्ये केलेले आहे. बाहेरील बाजूस मलमूत्र विसर्जन होण्यासाठी सोय आहे ते उघडयावरच दिसते. पहिल्या मजल्याला पश्चिम बाजूस दारे असलेल्या तीन खिडक्या आहेत. वायू विजनासाठी व प्रकाश आत येण्यासाठी चार खिडक्या आहेत. दुसऱ्या मजल्यावर दारे असलेली खिडकी व दोन छोटया खिडक्या आहेत. पूर्व बाजूस तळमजल्यावर तीन पायऱ्या असलेला एक मोठा दरवाजा दरवाजा, पाच लहान खिडक्या आहेत. पहिल्या मजल्यास तीन दरवाजे असलेल्या खिडक्या व पाच लहान खिडक्या आहेत. दुसऱ्या मजल्यास दोन दारे असलेल्या खिडक्या व तीन लहान खिडक्या आहेत. दोन्ही बाजूस पहिल्या व दुसऱ्या मजल्यास साधे हस्त आहेत. बांधकाम करताना विटांचा खुबीने वापर केला आहे. काही थर झाल्यानंतर जास्त भाजलेल्या व काळया झालेल्या विटांचा वापर केल्याने आकर्षकता वाढलेली आहे. उभ्या विटा रचून सुबकता आणलेली आहे. तळमजला व पहिला मजला याच्यामध्ये असलेल्या जाडयाकुंभ मोलीमेवर पानांची चित्रे काढलेली आहेत. त्यामुळे वाडयाची आकर्षकता वाढलेली आहे. वाडयाच्या समोर मोठे पटांगण आहे.[8]

## समारोप:

वाडयाचे बांधकाम दगड, वीट, चुना व मातीमध्ये केलेले आहे. वाडयाच्या तुळईच्या हस्तावर पिसारा फुलविलेल्या मोराचे असणारे शिल्प व हॉलमधील असणारे सुरूचे खांब, केळफूल असणाऱ्या महिरपी व तुळईस असणारे शरभमुखी तीर यावरून हा वाडा उत्तर पेशवाईमध्ये बांधल्याचे सिद्ध होते. वाडयामध्ये भिंतीमध्ये असणारे जिने व वाडयातील विहीर ही मराठाकाळातील स्थापत्याचे वैशिष्टय मानता येईल. शौचालय व गटाराची व्यवस्था तत्कालामध्ये स्वच्छतेची जाण असल्याचे स्पष्ट होते.

## संदर्भ:

1. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पुणे, 2010, पान. नं. 37.
2. शिवदे सदाशिव, महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे, खंड 1, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2013, पान.नं 130.
3. प्रत्यक्ष सर्वेक्षण, दि. 06.05.2018, वेळ दु.2.00 वा.
4. कित्ता
5. कित्ता
6. कित्ता
7. कित्ता
8. कित्ता